# ऑयकॉस

## एक आगळी वेगळी संस्था



सेवाक्षेत्रात आत्तापर्यंत वैद्यक सेवा, नर्सिंग, दंत चिकित्सा, संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, जाहिरात क्षेत्र, आयुर्विमा, मनोरंजन, जागाविक्री- खरेदी इ. अनेक सेवा क्षेत्रांची निगडित सेवा पुरविण्याची प्रथा आहे. नव्हे कोणत्या ना कोणत्या प्रकारे या सेवांची गरज मानव जातीला वेळोवेळी भासत आली आहे. या सर्व क्षेत्रांपेक्षा एका वेगळ्याच सेवाक्षेत्रात काम करणारी संस्था आहे ऑयकॉस ही ! या संस्थेचं नाव देखील ती पुरवत असलेल्या सेवेसारखंच आगळं वेगळं आहे. 'ऑयकॉस या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे घर, कुटुंब किंवा पृथ्वी. इको या शब्दाचं मूळ ऑयकॉस या शब्दात आहे. निसर्गाच्या पुनरुज्जीवनाबद्दल सेवा पुरवणारी ही संस्था आहे. खाजगी जागामालक हा या संस्थेचा टारगेट ग्रुप ! एखादा फ़ार्म हाउस प्लॉट विकत घेतल्यावर त्यावर सर्व (आपल्या शहरी सुखसोयींना लाजवेल असं) सुखसोयींनी सुसज्ज असलेलं घर बांधलं जातं. त्यासाठी वेळप्रसंगी प्लॉटवर असलेली स्वकीय झाडं काढून त्याजागी नर्सरीतली परकीय झाडं लावली जातात. यामुळे नकळत परिसरातल्या नैसर्गिक विविधतेचा ऱ्हास होत असतो.

ऑयकॉस ही संस्था प्लॉट्धारकाच्या इच्छेला अगदीच धुडकावून न लावता, परंतू तिथल्या निसर्गाची पर्यावरणीय हानीही न करता शक्यतो प्लॉट सुशोभित कसा करता येईल याचा सल्ला देते. ग्राहकाने विकत घेतलेल्या जमिनीवर निसर्गाला अनुरूप अशी बाग बनवून देणे, त्यासाठी त्या जागेचे सर्वेक्षण करणे, तेथील स्थानिक पर्यावरणाला अनुकूल झाडे लावणे अशा सेवा पुरवणारी ऑयकॉस ही एक व्यावसायिक संस्था आहे.

या संस्थेची संकल्पना केतकी घाटे आणि मानसी करंदीकर या दोघींची . मानसी इन्स्ट्रूमेंटेशन इंजिनिअर आणि पर्यावरणशास्त्रातली एम. एस्सी. ही पदवी देखील तीने प्राप्त केली आहे. केतकी रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र या विषयांची पदवीधर. असं असूनही निसर्गविषयक क्षेत्रात करिअर करण्याचा विचार दोघींच्या मनात आला नव्हता. पुण्यात इकॉलॉजिकल सोसायटीचा सस्टेनेबल मॅनेजमेंट चा एक वर्षाचा कोर्स करताना गोळे सरांच्या प्रेरणेमुळे निसर्गाच्या पुनरुज्जीवनाबद्दल सेवा पुरवण्याचा विचार पक्का झाला आणि जानेवारी २००२ मध्ये या दोघींनी ऑयकॉस या कंपनीची स्थापना केली.

ऑयकॉस तर्फे पुरवल्या जाणाऱ्या सेवांमधून स्थानिक झाडांच्या महतीचा प्रचार तर होत असतोच पण एव्हढंच पुरेसं नाही असं वाटून मानसी आणि केतकी या दोघींनी २००४ च्या किसान प्रदर्शनात पोस्टर्स लावून हा विचार मांडला. तरूवर नावाची माहिती पुस्तिका काढून त्याची प्रदर्शनात विक्री केली आणि महाराष्ट्रभरातले शेतकरी आणि इतर निसर्गप्रेमी यांच्यात हा विचार पसरवला.

या निमित्ताने स्थानिक झाडांची वर्गवार सचित्र माहिती देणारी सीडी काढायची ठरवून, श्री प्रकाश गोळे सर, वनस्पती तज्ज्ञ श्री महाजन सर, श्री मंदार दातार यांच्या मदतीने दोन-तीन वर्षे काम करून ग्रो नेटिव्ह ही सीडी २००६ साली वितरित केली. यात ३०० स्थानिक वनस्पतींची वर्गवार माहिती मिळते. पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष संवर्धन समितीमधे नेमलेल्या चार तज्ज्ञांमधे केतकी घाटे हिचा समावेश आहे. केतकीने वृक्षारोपण करताना प्रामुख्याने स्थानिक झाडं लावली जावीत हा प्रस्ताव मांडल्याने आता पुणे शहरात लावलेल्या वृक्षांमधे स्थानिक वृक्षांची संख्या वाढली आहे. स्थानिक लागवडीला प्रोत्साहन देण्याचा ऑयकॉसचा हा विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्यासाठी ग्राममंगल, बायफ़ यासारख्या संस्थांनी चालवलेल्या शैक्षणिक उपक्रमात ऑयकॉस सहभागी झालयं.

पुण्याजवळील लवासा सिटी प्रकल्प हा ऑयकॉसने

हाती घेतलेल्या प्रकल्पातील पहिला प्रकल्प. जैववैविध्याच्या दृष्टिकोनातून एक हॉट स्पॉट असलेल्या या जागेवर या प्रकल्पाला संमती मिळायलाच नको होती. पण निदान इथला निसर्ग वाचवण्याच्या द्रुष्टीने काय सल्ला देता येईल यासाठी ऑयकॉसने इथे काम सुरू केलं. प्रकल्पाअंतर्गत असलेल्या दहाहजार एकर जमिनीपैकी पाच हजार एकर क्षेत्राचं संपूर्ण सर्वेक्षण करून त्यांनी काही निष्कर्ष काढले आणि या निष्कर्षांच्या आधारे ऑयकॉसने प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांना काही सुझाव दिले. लवासा सारख्या जैववैविध्याने परिपूर्ण असलेल्या जागेत विकासाच्या नावाखाली तिथला निसर्ग नष्ट होवू नये यासाठी तिथल्या काही जागा संरक्षित क्षेत्र म्हणून राखीव ठेवण्याचा सल्ला दिला. विदेशी झाडांऐवजी स्थानिक झाडं लावणं अत्यावश्यक आहे हे पटवून दिलं. केवळ व्यवस्थापकांबरोबर काम न करता गावकऱ्यांबरोबर संवाद साधला. निसर्गशाळा घेऊन गावकऱ्यांना त्यांची निसर्गसंपत्ती जतन करण्यासंबंधी प्रवृत्त केलं.

लवासा सिटी प्रकल्पातल्या तीन वर्षांच्या अनुभवाने नैसर्गिक पुनरुज्जीवन सेवा पुरवण्याच्या कामाचा पाया भक्कम झाला.सर्वेक्षणाच्या पद्धती, त्या जागेच्या सर्वेक्षणातून केलेल्या नोंदींच्या सहाय्याने परिसर विकासाचं नियोजन करणे या सर्वाला स्पष्ट स्वरूप आलं.

संरक्षित जंगलांवर पर्यटनाचा भार हल्ली वाढू लागलाय. यासाठी पर्यटकांसाठी नवीन जागा विकसित होणं गरजेचं आहे. त्यातून स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होईल. या त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष स्वरूप आणण्याची संधी मानसी आणि केतकी यांना लवासाचं काम सुरू असताना लगेचच मिळाली. त्यांनी पुण्याजवळ पिरंगुट इथे एका फ़ार्महाऊसच्या जागेवर नेचर पार्क विकसित केला. डोंगर उतारावर असलेल्या या जागेवर त्यांनी तीन मार्ग विकसित करून लोकांना येथील जैवविविधता बघता यावी आणि त्यासंबंधी माहिती उपलब्ध व्हावी यासाठी माहिती फ़लक लावले. या भागाला मयूरबन असं नाव दिलं.

चाकण येथील एका कंपनीचं आवार विकसित करण्याचा प्रकल्प देखील ऑयकॉसने राबवला आहे. भली मोठी हिरवळ ठेवून तिचं संगोपन करण्यापायी पाण्याची नासाडी होते हे कंपनीला पटवून देवून त्यांनी परिसरात




स्थानिक झाडं लावली आणि कंपनीतून बाहेर पडणारं पाणी काही वैशिष्ट्यपूर्ण झाडं लावून वापरण्यासाठी योग्य केलं. यामुळे बागेला लागणारं पाणी काही प्रमाणात उपलब्धं झालं.

सिपला कंपनीचं आवार विकसित करण्याचं काम असूदे किंवा गोव्यातील हॉटेलबरोबर तेथील खाजण वने वाचविणं, बेंगलोरला तीनशे एकर जागेत इको रिसॉर्ट करणे, अभिनेता अतुल कुलकर्णी याच्या २४ एकर जागेत जंगलाचं पुनर्निर्माण करणे यासारख्या तीसहून अधिक प्रकल्पांवर ऑयकॉसने काम केलं आहे.

बायफ़ या संस्थेबरोबर फ़िश लॅडर ही अमेरिका आणि युरोप इथे रूढ असलेली संकल्पना राबवण्याची संधी ऑयकॉसला मिळाली. धरण बांधण्याच्या दुष्परिणामांपैकी एक म्हणजे माश्यांच्या स्थलांतराला अडथळा निर्माण होणे. यावर उपाय म्हणून माश्यांना पाण्याच्या विरुद्ध दिशेने उगमाकडे अंडी घालण्यासाठी पोहत जाता यावं यासाठी फ़िश लॅडर्स बांधल्या जातात. यामुळे माश्यांच्या रोडावत चाललेल्या संख्येला आळा बसायला मदत होते. हीच पद्धत वापरून ऑयकॉसने नाशिकच्या मोहापाडा येथील बंधाऱ्यात माश्यांचं स्थलांतर सुकर केलय.

गेली दोन वर्षे इंटरनेटच्या माध्यमातून सुमारे १५०० जणांना ऑयकॉस संस्था कॅलेंडर पाठवत आहे. गेल्या वर्षी वनस्पतींची माहिती, यावर्षी विविध परिसंस्थांची माहिती, अश्या पर्यावरणाशी निगडित माहितीचा प्रसार करणं हा कॅलेन्डर पाठवण्यामागचा हेतू आहे. एका आगळ्यावेगळ्या क्षेत्रात पाऊल टाकून ते भक्कम रोवून उभ्या असलेल्या या दोघी निसर्गसेविका, निसर्गसंवर्धन क्षेत्रातली अनेक आव्हानं पेलत या वाटेवरून यशस्वी प्रवास करतील यात शंका नाही.

*– अरुंधती भेडसगांवकर*